जा. क्र./NULM/825/2017
दि० 01/06/2017

**जळगांव शहर महानगरपालीका**
**नगर पथ विक्रेता समितीवर नामनिदर्शना करिता इच्छुक व्यक्तीकडून**
**अर्ज मागविण्याबाबत फेर जाहीर सूचना**

दिअयो-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्रेता विनिमय) योजना २०१७ च्या अंमलबजावणी करिता शासन परीपत्रकानुसार जळगांव शहर महानगरपालीका क्षेत्रासाठी नगर पथ विक्रेता समिती गठीत करवयाची आहे त्याकरिता खालील नगर पथ विक्रेता समितीवर नाम नामनिदर्शनासाठी इच्छुक व्यक्तीकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना | - सदस्य संख्या २ |
| निवासी कल्याण संघ | - सदस्य संख्या २ |
| व्यापारी संघाचे प्रतिनिधी | - सदस्य संख्या १ |
| पणन संघाचे प्रतिनिधी | - सदस्य संख्या १ |

**नगर पथ विक्रेता समितीच्या नाम निर्देशित सदस्यासाठीची किमान अहर्ता**

१) संघटनेची किवा संघाची,नियम ११ च्या उप-नियम (४ ) मध्ये विनिद्रिष्ट क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोदणी केलेली असावी.
२) संघटना किवा संघ,मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षण अहवाल सादर करील.
3) संघटनेस किवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
4) संघटना किवा संघ त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याने सिद्धदोषी असणार नाहीत.
5) संघटना किवा संघ यांना,त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोदणी केलेल्या त्याच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.
6) संघटना/संघ किवा अर्ज सादर करणारे हे जळगाव शहरातील रहिवासी असावे.

पथ विक्रेता समितीमध्ये समाविष्ट होण्यास इच्छुक सदस्यांनी दि.16/06/2017 पर्यंत कार्यलयीन वेळेत अर्ज परिपूर्ण सुवाच्य अक्षरात भरून भ्रमणध्वनी व परिपूर्ण पत्यासह आवश्यक दस्तऐवजाच्या प्रतीसह या कार्यालयात जमा करावे.

अध्यक्ष
पथ विक्रेता समिती तथा आयुक्त
जळगांव शहर महानगरपालीका
जळगांव

१)प्रभाग समीती क्रमाक 1 ते 4
२)श्री.योगेश बोरोले,प्रकल्प् विभाग
३)जमादार मनपा
नोटीस फलकावर तसेच मनपा संकेतस्थळावर जाहीर सूचना प्रसिद्ध करावी.